।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * मंगळवार दि.४ जून २०२४ (विशेष अंक) * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक २१ वा

## सांगोला शहरा जवळ झालेल्या अपघातात सायकलस्वाराचा मृत्यू



सांगोला: मंगळवेढा येथील उद्योजक व शीतल कलेक्शनचे मालक सुहास ताड यांचा सांगोल्याजवळ अपघाती मृत्यू झाला. हा अपघात आज सोमवारी सकाळी सांगोला पंढरपूर रोडवर असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राजवळ घडला. अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

दोन दिवसात कारने मोटर सायकलला धडक दिल्यामुळे तिघा मेंढपाळाचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच सकाळी पुन्हा अपघात घडल्याने सांगोला पंढरपूर रोड मृत्यूचा सापळा बनल्याची चर्चा सुरु आहे. रस्ता चांगला झाल्यामुळे चारचाकी वाहने बेदरकारपण व वेगाने चालवून अपघातास निमंत्रण देत आहेत.

मंगळवेढा येथील व्यापारी सुहास ताड या सायकल स्वारास धडक देऊन घटनास्थळी न थांबता वाहनधारक वाहनासह पसार झाला आहे. सांगोला पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर सदरील घटना घडली असल्याने सांगोला पोलीस स्टेशनने या अज्ञात वाहनधारकाचा तपास करावा अशी मागणी सांगोला सायकलर्स क्लब सांगोला यांनी केली होती.

दरम्यान सदरील अपघातातील लक्झरी गाडी पोलिसांनी जत येथून पकडल्याची माहिती आहे.

गेल्या दिवाळीपूर्वी त्यांचा मंगळवेढा येथे असलेला मॉल शॉर्टसर्किटमुळे जळून खाक झाला होता. त्यातून ते कसेबसे सावरले होते आणि आज काळाने त्यांच्यावर घाला घातल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

## कार व दुचाकीच्या धडकेत तीन युवकांचा दुर्दैवी मृत्यू

### पंढरपूर रस्त्यावरील मांजरी पुलावर झाला अपघात




सांगोला : अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील कार हयगयीने अविचाराने भरधाव वेगाने चालवुन दुचाकीला जोराची धडक दिल्याने भीषण अपघातात कर्नाटक राज्यातील तीन तरुणांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला असल्याची घटना रविवारी रात्री ८.१५ वाजणेच्या सुमारास सांगोला– पंढरपूर रोडवरील बामणी गावाजवळ घडली.

अपघातामध्ये महाळाप्पा धनगर रा.पट्टनकुडी ता .चिकोडी जि.बेळगाव, विठ्ठल दिवटे रा.गायकवाडी ता.निपाणी व बिराप्पा कोळेकर रा. कोगनुळी ता.निपाणी अशी मृत तरुणांची नावे आहेत .याबाबत बिरु धनगर रा पट्टणकुडी ता चिकोडी जि बेळगाव यांनी कार चालकाविरुद्ध फिर्याद दिली आहे.

अपघाताबाबत अधिक माहिती अशी की,महाळाप्पा धनगर, विठ्ठल दिवटे, बिराप्पा कोळेकर हे तिघेजण तनाळी ता. पंढरपुर येथुन शिरढोण येथे देवाला मोटारसायकलवरुन निघाले होते. पंढरपुर ते सांगोला जाणारे रोडवर मांजरी गावचेपुढे मौजे बामणी येथे ओढ्याजवळ आले असता सांगोल्याकडुन येणाऱ्या कारच्या अज्ञात चालकाने मोटर सायकलीस समोरुन जोराची धडक दिल्याने मोटार सायकलवरील तिघांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. अपघातानंतर चालक कार जागीच लावुन पळुन गेला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

कारचे अज्ञात चालकाविरूध्द तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोसई पुजारी करीत आहेत.

## सांगोला-कडलास रोडच्या रखडलेल्या रस्त्याचे कामासंदर्भात रास्ता रोको

### १५ जून पर्यंत रस्त्याचे काम करण्याचे लेखी आश्वासन

सांगोला : सांगोला–कडलास रोड नदी पुलाजवळील बरेच वर्ष रखडलेल्या रस्त्याचे काम अद्यापही अपूर्ण असल्याने व याठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने सदरच्या रखडलेल्या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, याकरिता काल समस्त कडलास ग्रामस्थ यांच्यावतीने शनिवार दि.१ जून रोजी भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कडलास ग्रामस्थांसह डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी स्वत: रस्त्यावरच ठिय्या मांडला होता. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनाच्या रांगा लागल्या होत्या.

याप्रसंगी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व शेकाप नेते डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी रखडलेले काम लवकरात लवकर मार्गी लावावे अशी मागणी करत संबंधीत विभागाच्या कामकाजाविषयी तीव्र संताप व्यक्त केला. त्यावेळी संबंधित विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी १५ जून २०२४ पर्यंत रस्त्यांचे काम करु असे लेखी दिल्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले. सदर रास्ता रोको प्रसंगी दत्ताभाऊ टापरे ,दत्ताभाऊ जाधव, सरपंच दिगंबर भजनावळे, शेतकरी सहकारी सूतगिरणीचे व्हा.चेअरमन



ॲड.नितीन गव्हाणे, समाधान पवार,राहुल गायकवाड , संभाजी साळुंखे, संजय गायकवाड, पांडूरंग भजनावळे, अशोक ठोकळे, केशव गायकवाड, ताजू इनामदार यांच्यासह कडलास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# सांगोला विद्यामंदिरच्या प्राचार्यपदी अमोल गायकवाड यांची नियुक्ती



सांगोला : सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सांगोला प्राचार्य गंगाधर घोंगडे यांचे सेवानिवृत्तीनंतर रिक्त झालेल्या प्राचार्य पदावर नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल गायकवाड यांची नियुक्ती झाली.

सुरुवातीला संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.व प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर संस्थाअध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला. यावेळी माजी प्राचार्य गंगाधर घोंगडे, उपप्राचार्य शहिदा सय्यद व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य गायकवाड यांनी १५ जून २००७ पासून सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथे ६ वर्षे सहशिक्षक, १ जून २०१३ ते ३० जून २०२० पर्यंत सात वर्षे कोळा विद्यामंदिर कोळा येथे प्राचार्य व १ जूलै २०२० ते ३१ मे २०२४ नाझरा विद्यामंदिर नाझरा येथे चार वर्ष प्राचार्यपदी सेवा केली. आपल्या अध्यापनातून व प्रशासकीय कार्यातून तसेच इतर शैक्षणिक कार्यातून त्यांनी वेगळा ठसा उमटवला त्यामुळेच त्यांना सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघ व परिवर्तन सामाजिक संस्था पुणे कडून आदर्श मुख्याध्यापक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. या नियुक्तीसाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके, सर्व संस्था कार्यकारिणी सदस्य, संस्थापक अध्यक्ष थोर स्वातंत्र्य सेनानी कै. गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके यांचे विचार व तत्व याला प्रमाण मानून शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या सांगोला विद्यामंदिरमध्ये प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल मला मनस्वी आनंद आहे.

यापुढेही संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं.घोंगडे सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके व सर्व संस्थाकार्यकारणी सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्यपदी कार्य करताना विद्यार्थ्यांच्या गुणात्मक व रचनात्मक विकासाबरोबरच शाळेच्या उन्नतीसाठी व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील असणार आहे,असे नूतन प्राचार्य अमोल गायकवाड, सांगोला विद्यामंदिर यांनी सांगितले.

शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नूतन प्राचार्य अमोल गायकवाड यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## एस.टी.चा ७६ वा वर्धापन दिन सांगोल्यात उत्साहात साजरा



सांगोला : सांगोला बस स्थानकामध्ये एस.टी.चा ७६ वा वर्धापन दिन केक कापून व प्रवाशांना गुलाब पुष्प देऊन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. एस.टी.च्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त सांगोला बस स्थानकावर विद्युत रोषणाई करून बसस्थानक सजवण्यात आले.

वर्धापन दिनानिमित्त काढलेली भली मोठी रांगोळी प्रवाशांचे लक्ष वेधून घेत होती. यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवर व अधिकाऱ्यांच्या हस्ते एस.टी.चे पूजन करण्यात आले. आगार व्यवस्थापक विकास पोकळे यांनी उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केल्यानंतर वर्धापन दिनानिमित्त प्रवाशांच्या हस्ते केक कापण्यात आला.

यावेळी एस.टी. मधून सेवानिवृत्त झालेल्या रमेश शिवगोंडा पाटील, रमेश संभाजी चंदनशिवे, निवृत्ती शंकर ईरकर, गोरक जालिंदर कळकुंबे, सुब्राव मनोहर सरवदे, राजकमार ज्ञानोबा गवळी, नागनाथ विठोबा केदार,नाना सोपान काशिद, बाबासाहेब शिवराम वलेकर या ९ कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पत्रकार नागेश जोशी यांनी एस.टी. च्या आजपर्यंतच्या वाटचालीचा इतिहास सांगुन वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, डॉ.अनिल कांबळे, अरविंद केदार, डॉ.मानस कमलापूरकर, सहा.कार्यशाळा अधीक्षक पृथ्वीराज पारसे, वाहतूक निरीक्षक सागर कदम, वाहतूक नियंत्रक उत्तम बुरुंगळे, वरिष्ठ लिपिक प्रताप टकले, लिपिक संतोष ढोले, लिपिक आशिष सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

## दहावी नंतरच्या डिप्लोमा इंजीनियरिंग प्रवेश प्रक्रियेला शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सुरुवात

सांगोला : सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५करिता डिप्लोमा इंजीनियरिंग प्रवेश प्रक्रियेला दि.३०/०५/२०२४ पासून सुरुवात झाली असल्याची माहिती कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख यांनी दिली. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र (६४७१) ला मान्यता मिळाली असून बुधवार २९/५/२०२४ पासून ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्चिती या प्रक्रिया सुरु झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना फक्त दहावीच्या परीक्षेचा आसन क्रमांक टाकून प्रवेश अर्ज भरता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना जन्म प्रमाणपत्र किंवा रहिवाशी दाखला आवश्यक आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांनी दिली.

विद्यार्थी दिनांक २९/५/२०२४ ते २५/६/२०२४ या कालावधीत प्रवेश प्रक्रियेसाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावरून अर्ज छाननीची योग्य पद्धत निवडून ऑनलाइन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे तसेच आपल्या प्रवर्गासाठी कागदपत्रांची पडताळणी करून आपला प्रवेश अर्ज निश्चित करू शकतात. दिनांक २७/६/२०२४ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करण्यात येतील. विद्यार्थी त्यांच्या प्रवेश अर्जात काही त्रुटी असल्यास दि.२८/६/ २०२४ ते ३०/६/२०२४ यादरम्यान दुरुस्त्या करून घेऊ शकतात. मंडळाच्या संकेतस्थळावर दि.२/७/२०२४ रोजी अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करण्यात येतील. सांगोला, जत, मंगळवेढा तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन संबंधित कागदपत्रे जमविताना येणाऱ्या अडचणी व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज सांगोला येथे सुविधा केंद्र असून याचा फायदा पालकांनी घ्यावा असे आवहान संस्थेचे अध्यक्ष श्री. बी. आर. गायकवाड यांनी केले.

शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजचे हे १६ वे वर्ष असून कॉलेजने आपली उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून येथून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणारे विद्यार्थी हे एक परिपूर्ण इंजिनियर किंवा व्यावसायिक होऊन बाहेर पडतात. कॉलेजमध्ये असणाऱ्या उपलब्ध सुविधा, शिक्षणाचा दर्जा, शिस्त या गोष्टीमुळे पालकांची नेहमीच शिवाजी पॉलिटेक्निकला पसंती राहिली आहे. सन २०२४-२५ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील सुविधा केंद्रातील सर्व यंत्रणा सज्ज असून विद्यार्थांनी गव पालकांनी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी सुविधा केंद्र प्रमुख प्रा. एस. एस. गायकवाड यांच्याशी ९८६०९८०७३८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान प्राचार्य. डॉ. आर. ए. देशमुख यांनी केले.

## संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे अनुदान डीबीटी मार्फत वाटप

सांगोला : शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा १५००/- रुपये अनुदान दिले जाते. हे अनुदान लाभार्थ्यांना तहसिल स्तरावरून बँकेत पाठवून संबंधितांच्या खात्यावर वर्ग केली जाते. मात्र आता थेट डीबीटी मार्फत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान वितरीत केले जाणार आहे.

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभासाठी यापूर्वी तहसिल कडून संबंधित बँकेत सर्व लाभार्थ्यांची यादी पाठवून त्यानूसार निधी दिला जात आहे, तो निधी बँकेकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात आहे. परंतु आता संगायो व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अनुदान बँकेच्या खात्यावर थेट डीबीटी मार्फत मिळणार आहे. त्यासाठी संगायो निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचा लाभ घेत असलेल्या पात्र लाभार्थ्यांकडून आधारकार्ड आणि मोबाईल क्रमांक संकलित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. याबाबत गावस्तरावर तलाठयांना आवश्यक सुचना देण्यात आल्या आहेत.

संगायो व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र , बँक पासबुक ,आधार कार्ड मोबाईल क्रमांक इ. आवश्यक कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाच्या संजय गांधी शाखेत अथवा संबंधित गावचे तलाठी यांचे कडे १५ जून २०२४ पर्यंत जमा करावेत. जे लाभार्थी आवश्यक कागदपत्रे जमा करणार नाहीत ते लाभार्थी अनुदानापासून वंचित राहतील याची नोंद घ्यावी.

विशेष सहाय्य योजनेचे लाभर्थी हे अनुदानापासून हे वंचित राहू नये यासाठी लाभार्थ्यांनी आपली कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाचे संजय गांधी शाखा अथवा गाव तलाठी यांचे कडे जमा करावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासन यांचे कडून करण्यात येत आहे.

आवश्यक कागदपत्रे:- हयात प्रमाणपत्र, आधारकार्ड छायांकित प्रत, बँकेचे पासबूक छायांकित प्रत, मोबाईल नंबर ( मोबाईल नंबर व आधारकार्ड त्या बँकेच्या खात्याला लिंक केला असेल त्या बँक खात्यात सदर अनुदान जमा होणार आहे.) शिधापत्रिका छायांकित प्रत, दिव्यांग प्रमाणपत्र इ.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४१ वे अंक-२७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अनिकेत देशमुख यांची निवड

सांगोला : सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोलाच्या अध्यक्षपदी डॉ. अनिकेत देशमुख यांची निवड करण्यात आली.संस्था उपाध्यक्षपदी श्री.रामचंद्र खटकाळे तर संस्था सचिव पदी श्री विठ्ठलराव शिंदे सर यांची फेरनिवड करण्यात आली.



सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोलाच्या संस्था सदस्यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी संस्था सदस्य श्री.चंद्रकांतदादा देशमुख, श्री.बबनराव जानकर, प्रा.डॉ.अशोकराव शिंदे, प्रा.दीपक खटकाळे, श्री.अवधूत कुमठेकर, प्रा.जयंत जानकर व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

या शैक्षणिक संस्थेची स्थापना १५ मे १९६९ रोजी करण्यात आली. डॉ.गणपतराव देशमुख यांच्या प्रेरणेने या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेचा मुख्य उद्देश तालुक्यातील व परिसरातील शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेच्या मुलांना सर्वात कमी फी मध्ये उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे हा आहे.

याप्रसंगी बोलताना डॉ.अनिकेत देशमुख म्हणाले की, एवढ्या मोठ्या विस्तारीत शैक्षणिक संस्थेचे अध्यक्षपद भूषविणे हे माझ्यासाठी खूप अभिमानास्पद आहे कारण ज्या संस्थेचे अध्यक्षपद डॉ.भाई गणपतरावजी देशमुख यांनी भूषवले ती उंची गाठणे माझ्यासाठी खूप कठीण आहे. शैक्षणिक क्षेत्रामधील सध्याच्या सर्व आव्हानांना पेलून एका नवीन व्हिजनसह संस्था सर्वांना विश्वासात घेवून, सर्वांच्या सहकार्याने पुढे नेण्याचा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखवला. या निवडीबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.


## सांगोल्यात जागतिक सायकल दिन साजरा



सांगोला : जागतिक सायकल दिनानिमित्त सांगोला सायकलर्स क्लबतर्फे राईडचे राष्ट्रीय महामार्ग एनएच १६६ या मार्गावर आयोजन करण्यात आले होते. यावेळी जागतिक सायकल दिनानिमित्त बोलताना बाळासाहेब टापरे सरांनी शारीरिक तंदुरुस्तीतून उत्तम आरोग्य सायकलचा प्रचार व प्रसार करून प्रदूषण कमी करणे व सायकलिंग हा खेळ प्रकार ग्रामीण भागात माहिती व्हावा याकरिता हा क्लब विविध राईडचे आयोजन करीत असलेचे सांगितले.

आरोग्यदायी जीवनासाठी सायकल चालवणे हा अनेक सायकलिस्ट यांचा शिरस्ता बनला आहे सांगोल्यातील अनेक तरुण, व्यापारी तसेच इतर क्षेत्रातील बरेच जण सायकल शर्यतीत भाग घेत आहेत त्यामुळे सांगोल्यातील सायकल शर्यतीची क्रेझ निर्माण झाल्याचे युवा सायकलिस्ट युवा सायकलिस्ट नीलकंठ शिंदे सर यांनी सांगितले. सांगोला शहराजवळ घडलेल्या अपघातात मंगळवेढा येथील सायकलिस्ट सुहास ताड यांचे अपघाती निधन झाल्याने त्यांना यावेळी सांगोला सायकलर्स क्लबच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सांगोला क्लबचे सायकलीस्ट व नागरिक उपस्थित होते.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा....
साप्ताहिक
माणदेश वार्ता



# भावपूर्ण श्रध्दांजली !!!

## चौदावे पुण्यस्मरण

देव घरातल्या दिव्या,रात नाही रे सरली,वात फुलायच्या आधी,
कशी विझुनिया घेली,जाण्या पैलतिरी आधी,कशी नाव उलटली,
मैदानाच्या सवंगडया,खेळी अपुरी राहिली दु:ख अंतरी मावेना,
अश्रु दाटले नयनी...!!!







### कै. मारूती शिवाजी सोनवणे

(मृत्यू दिनांक ४ जून २०१०)

## शोकाकूल

श्रीमती लता मारूती सोनवणे

श्रीमती नलिनी विठ्ठल पोळ
श्रीमती शोभा राजाराम कटके
श्रीमती निर्मला भागवत सोनवणे

ॲड.श्री.रोहित मारूती सोनवणे
श्री.शैलेंद्र सुर्यकांत पोळ
श्री.बाबासाहेब पांडूरंग चौधरी
श्री.विश्वजित भागवत सोनवणे
कु.अमरजित भागवत सोनवणे
चि. मयुर,चि.क्षितीज,शौर्य



सौ.शितल रोहित सोनवणे
सौ.संध्याराणी शैलेद्र पोळ
सौ.श्रध्दा बाबासाहेब चौधरी
सौ.साधना विश्वजित सोनवणे
कु.पूजा मारूती सोनवणे
चि.मंथन,नवलाई,क्रिश,शंतनू

**सोनवणे, खंदारे, कटके, पोळ, बोराडे, शिंदे, चौधरी परिवार**